# <u>प्रेस नोट</u>

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.१३/०१/२०२५

आरोपी लोकसेवक रविंद्र शिवचरण वाडेकर वय ५२ वर्षे,कनिष्ठ लिपीक(महसुल सहायक)अभिलेखागार कक्ष,जिल्हाधीकारी कार्यालय,वाशिम यांना १,०००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | रविंद्र शिवचरण वाडेकर वय ५२ वर्षे,कनिष्ठ लिपीक(महसुल सहायक)अभिलेखागार कक्ष,जिल्हाधीकारी कार्यालय,वाशिम |
| लाच मागणी रक्कम | १,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या नावे असलेल्या प्लॉटचा एन.ए.आदेश व नकाशा देण्याकरीता आलोसे यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | ए.एम.गायकवाड, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांना त्यांचे नावे असलेल्या प्लॉटचा एन.ए.आदेश व नकाशा देण्याकरीता १,०००/- रु. लाचेची मागणी केल्याची दि. १३/०१/२०२५ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. १३/०१/२०२५ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे नावे असलेल्या प्लॉटचा एन.ए.आदेश व नकाशा देण्याकरीता १,०००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवील्याचे निष्पन्न झाले.

दि. १३/०१/२०२५ रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता आलोसे रविंद्र वाडेकर,कनिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांच्या कडून लाच रक्कम १,०००/- रुपये स्विकारल्याने आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वाशिम जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक सचिंन्द्र शिंदे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनात  बालाजी तिप्पलवाड,प्रभारी पोलीस उपअधिक्षक,ए.एम. गायकवाड पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.वाशिम  व अंमलदार पोहवा. नितीन टवलारकर, विनोद मारकंडे,विनोद अवगळे, राहुल व्यवहारे,आसिफ शेख,पोना.योगेश खोटे,रविंद्र घरत,उज्वल देशमुख चापोना मिलींद चन्नकेशला ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बालाजी आर तिप्पलवाड,प्रभारी पोलीस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं.- १०६४
बालाजी आर.तिप्पलवाड -७०२०१५५३११

( बालाजी आर तिप्पलवाड )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम

पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो • वाशिम •